महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३९ वा | दिनांक : १९/०७/२०२५ | वार : शनिवार

## निवडणूक जाहीर झाली की राज ठाकरेंसोबत चर्चा करू : उद्धव ठाकरे



**मुंबई :** अनेक वर्षांनी आम्ही दोघे एका व्यासपीठावर एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी, असे विधान शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले होते. परंतु, त्यानंतर राज ठाकरे यांनी युतीबद्दल सावध भूमिका घेतली असून मराठीच्या मुद्यासाठी आम्ही एकत्र आलो असून यात राजकीय मुद्दा नसल्याचे त्यांनी म्हटले होते. त्यानंतर आज पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, निवडणूक जाहीर होऊ द्या, मग चर्चा करू शकतो.

पत्रकार परिषद घेत उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, मी स्वतः पीक कर्ज मुक्तीची घोषणा केली होती. आम्ही सुरू केले तेव्हा सरकार पाडले गेले. मी अनुभव नसताना पहिल्या अधिवेशनात केले. तुम्ही मंत्री आहात, खाती असतात, अभ्यास कसला करत आहात कर्ज मुक्तीसाठी, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

माझा चेहरा हसराच असतो, मी रेडा कुठे कापला नाही, असा टोला देखील उद्धव ठाकरे यांनी लगावला. पुढे बोलताना ते म्हणाले, आज अधिवेशन संपत आहे. ३ आठवड्याचे अधिवेशन होते. जनतेच्या समस्या संदर्भात प्रश्न होते. मुख्यमंत्र्यांचे भाषण कसे होते, आईला मुलगा म्हणतो आईसक्रीम हवे आहे. आता काही होत नाही, भविष्यात हे होईल, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला. पुरवण्या मागण्यावर जास्त भर दिला. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे, हे कर्ज कसे फेडणार? कर्ज कमी कसे करणार? योजनेचे काय? लाडका भाऊ-बहीण यांची उत्तरे आली नाहीत, अशी टीका ठाकरेंनी केली.

कालच विधानभवनात हाणामारी झाली, अध्यक्षांनी उच्चस्तरीय चौकशी नेमली आहे. या गुंडांची इतकी हिंमत झाली आहे. मात्र धाडस झाले कसे? असा सवाल ठाकरेंनी केला. सत्तेच्या लालसेपोटी हे राजकारण सुरु आहे. हे सत्तेचे माजकारण आहे. चड्डी गँग माईक टाईसन समजतात. गळ्यात दात घालून फिरणारे कसे माजलेत. यांना कोणी जाब विचारणार की नाही असे ठाकरे म्हणाले.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, पीक विमा रद्द केला आहे. ३ हजार कोटींची चोरी सुप्रीम कोर्टाने पकडली, तरी चोर फिरतोय. विधानभवनात अशा घटना घडत असतील तर राष्ट्रपती राजवट लागू करावी. याला मी स्वप्न रंजन वाटीका म्हणतो. विरोधी पक्षनेता पाशवी बहुमत असताना देत नाही. अल्पमतातले सरकार मांडता येत नाही. व्यक्तीस्वातंत्र्य असल्याने त्रिभाषा सूत्र आणत आहे. मात्र, आम्ही तो आणू देणार नाही.

## एवढ्या लवकर रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पाहिला नाही : एकनाथ शिंदे



**मुंबई :** विधानसभा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळाले. ३ वर्षांपासून माझ्या नावाने फक्त शिव्या-शाप सुरू आहेत. सभागृहात दोन दिवस चर्चा जाळली, मी अंबादास यांचे कौतुक करत होतो, कोणाला काय इतके लागण्याचे कारण नव्हते. पावसाळ्यात छत्र्या उगवतात की बेडूका, परंतु एवढ्या लवकर रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पाहिला नाही, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

ठाकरे गट आणि मनसेच्या युतीच्या चर्चेवर एकनाथ शिंदे यांनी टोला लगावला, ज्यांना संपलेले बोलले, त्यांच्याच सोबत आता रोज जात आहेत. चल मेरे भाई हात जोडता हूं, या गाण्याची आठवण होत आहे, असे म्हणत खोचक टीका केली आहे. तसेच देवेंद्रजी यांना किती शिव्या दिल्या याचे साक्षीदार आम्ही आहोत. जनतेने शिवसेना भाजपला मतदान केले होते. आम्ही ताटात माती कशी कालवली? माती तर तुम्ही केली, देवेंद्रजींच्या पाठीत खंजीर खुपसला, असे शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, निवडणुकीच्या निकालानंतर देवेंद्रजी यांनी अनेक फोन केले, पण फोन उचलला नाही. केलेले इथेच फेडावे लागते. मुंबईचे महापौरपद देवेंद्र फडणवीस यांना मिळाले होते, तेव्हा अर्ध्या तासात त्यांनी महापौरपद शिवसेनेला दिले. पण, परतफेड न करता दगाबाजी केली. साधा फोन उचलायचा असता, असे म्हणत शिंदेंनी उद्धव ठाकरेंना केले लक्ष्य.

देवेंद्रजींना बोलले एक तर तू राहशील नाहीतर मी राहीन, कट कारस्थान करून आत टाकायचा प्रयत्न केला. तेव्हा मी ठरवले की आता कार्यक्रम करायचा. माझ्यावर टीका करायच्या आधी तुमच्याकडे तीन बोट येतात. मुख्यमंत्री यांच्याकडे सगळेच जातात, किती द्वेष. मी सर्वसामान्य कुटुंबाचा मुलगा मुख्यमंत्री झाला. इतकी पोटदुखी असता कामा नये. हे जे काही सुरू आहे, ते पाहून देवेंद्रजी मनातल्या मनात हसत असतील, असेही एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

एकीकडे आरएसएसला टोमणे मारायचे बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या नरेंद्र मोदी आणि अमित भाईंना शिव्या द्यायच्या. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांना बुके द्यायचा. केमिकल लोचा झाला बहुदा, असा टोलाही एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लगावला. पुढे ते म्हणाले, किती कोतेपणा आहे, आपण लता मंगेशकर संगीत महाविद्यालय करणार होतो. २४ एप्रिल २०२२ रोजी हृदयनाथ मंगेशकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पहिला लता मंगेशकर पुरस्कार दिला आणि तिथेच पापड मोडला. मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात कार्यक्रम झाला, तिथं हे आले नाहीत. नरेंद्र मोदीबाबत यांच्या मनात किती द्वेष आहे, याचे साक्षीदार उदय सामंत आहेत.

जळी-स्थळी काष्ठी पाषाणी मी दिसतोय. ३ वर्षांपासून रोज शिव्या शाप, आरोप, मत्सर एकच कॅसेट रोज ऐकतोय. पद येतात-जातात पण एकनाथ शिंदेला अडीच कोटी महिलांचा भाऊ ही उपाधी मिळाली. आम्ही गुवाहाटीला असताना निरोप यायचे, दुसरीकडून दिल्लीत संधान साधायचे की यांना घेऊ नका, आम्ही येतो हे चालले होते. आम्ही सत्ता सोडून गेलो, मी छेडत नाही पण मला छेडले तर मी सोडत नाही. सत्ता आणि खुर्चीसाठी अनेकांनी तडजोड केली, मी करणार नाही असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ जुलै २०२५


## जातं

आई दळीते दळण
जातं फिरे गरगर
ओठातून रे आईच्या
ओवी येई भरभर..

आई गाई गुणगान
तिच्या माहेराचं सारं
दळताना जात्यावर
पीठ येई सरसर..

आई माझी नित्य उठे
भल्या झांजळ पहाटे
जात्यापासी ती बसता
कर्मयोगी मज वाटे..

अन् चंद्र भाकरीचा
जात्यातून जन्म घेई
आई माझी अन्नपूर्णा
दोन घास आम्हा देई..

आई दळण दळूनी
जाई भरण्यास पाणी
पाणी ओढी आडातून
सारे रांजण भरुनी..

करे भाकरी आम्हास
अन निघे वावरात
बापासंगे भरडली
आई संसार चक्रात..

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

## उमरगा परिसरातील वैदुंना वैद्यकी प्रमाणीकरणाचे मार्गदर्शन - शिवाजी महाविद्यालयाचा पुढाकार



**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : औषधी वनस्पतींचा पारंपरिक पद्धतीने वापर मनुष्य फार पूर्वीपासून करीत आहे. या ज्ञानाची नोंद झाली तर ते अनेक पिढ्यांसाठी कामी पडते. पण शास्त्रीय पद्धतीने नोंद कशी ठेवावी याचे मार्गदर्शन त्यांना मिळत नाही. त्यामुळे हा अमूल्य ज्ञानठेवा नष्टही होऊ शकतो. त्याचे संवर्धन करण्याच्या हेतूने वारसा या संस्थेसोबत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने सामंजस्य करार केला असून त्याचा परिसरातील सर्व वैदूंना निश्चित उपयोग होईल असे मत कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ. संजय अस्वले व्यक्त केले. लोकवनस्पति आणि पारंपरिक ज्ञानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना व समाजाला समजून सांगितला पाहिजे.

या उदात्त हेतूने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या आयक्यूएसी, वनस्पतीशास्त्र विभाग, वारसा-एथनिक नॉलेज हेरिटेज सोसायटी, अंजनगाव सूर्जी जि. अमरावती, श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, अमरावती (महाराष्ट्र) आणि ट्रान्स-डिसिप्लिनरी हेल्थ सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (TDU), बेंगळुरू यांच्या संयुक्त विद्यमाने, "वैदू परंपरेचे संवर्धन व प्रमाणीकरण" या विषयावर ऑनलाइन राष्ट्रीय एक दिवसीय कार्यशाळा दि. १८ जुलै २०२५ ला संपन्न झाली.या एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयच्या विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासमवेत धाराशिव, लातूर, सोलापूर, या जिल्ह्यातील एकूण २४ वैद्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

वैदुंचा परिचय मेळाव्या सोबतच वनस्पतींची ओळख, लागवड, औषध निर्मिती प्रक्रिया, वैद्य म्हणून शासकीय पातळीवरून प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया यावर सविस्तर मार्गदर्शन डॉ. एस. एच. पाटील (IFS Retd.) अध्यक्ष, जैवविविधता मंडळ, महाराष्ट्र राज्य, डॉ. दिनेश खेडकर अध्यक्ष, वनस्पतीशास्त्र अभ्यासमंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. प्रभा भोगांवकर-अध्यक्ष, वारसा: एथनिक नॉलेज हेरिटेज सोसायटी, डॉ. प्रकाश बी. एन.- सहयोगी प्राध्यापक, TDU, बंगलोर, डॉ. प्रियंका सरकार- प्रकल्प व्यवस्थापक, PAD विभाग, QCI, नवी दिल्ली, डॉ. देवयानी शर्मा- अध्यक्ष, ग्रीन कॅनोपी फाउंडेशन, रायपूर, छत्तीसगड, सौ. हर्षा भुवन-शरयू फार्मास्युटिकल्स, अकोला आदींनी केले.

या कार्यशाळेच्या आयोजनासाठी भारत शिक्षण संस्थचे अध्यक्ष श्री अमोल मोरे, उपाध्यक्ष श्री अश्र् लेश मोरे, यांनी प्रोत्साहित केले.या मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या वैदुंचा यथोचित गौरव वारसा संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक डॉ. अशोक पदमपल्ले, समन्वयक डॉ विनोद देवरकर, सहसमन्वयक डॉ. आशा शिंदे, डॉ. व्यंकट सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाच्या सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभ सोहळ्याचे सूत्रसंचलन डॉ. मनोरंजना निर्मळे यांनी केले तर डॉ. आशा शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ जुलै २०२५


## राज्यात निर्माण झालेली गुंडगिरी भाजप पुरस्कृत : बाळासाहेब थोरात

**मुंबई** : कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. महायुतीचे सरकार सत्तेवर कसे आले, त्यांनी कोणते फंडे वापरले, पक्ष कसे फोडले, चुकीचे निकाल कसे दिले, हे सर्वांना माहीत आहे. महाराष्ट्रात गुंडांना आणि वाचाळवीरांना सरकारकडून एक प्रकारे मुभा दिली जात असून राज्यात निर्माण झालेली दहशत आणि गुंडगिरी ही भाजप पुरस्कृत असल्याची टीका थोरात यांनी केली आहे.

विधानसभेत झालेला राडा, आमदार निवासातील भांडण आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीवर बाळासाहेब थोरात यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रात सध्या जे घडत आहे ते अत्यंत दुर्दैवी आहे. बीडमधील निरपराध सरपंचाला ज्या पद्धतीने मारले गेले, ते मानवतेला लाज वाटणारे आहे. एक आमदार पोलिस स्टेशनमध्ये गोळीबार करतो, एक आमदार कँटीनमधील वेटरला मारहाण करत आहे. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना गुंडांनी मारहाण केली ते गुंड भाजपचे पदाधिकारी असल्याची टीका थोरात यांनी केली आहे.

एखाद्या समाजाला विरोध करायचा, वडीलधाऱ्यांना काहीही बोलायचे अशी भाजपने काही गुंड आणि वाचाळवीरांना मुभा दिलेली आहे. एक प्रकारे राज्यांमध्ये दहशत निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, असे बाळासाहेब थोरात म्हणाले. तसेच आज महाराष्ट्रात नियंत्रण नाही, गुंड फोफावले आहेत. दहशत निर्माण झाली आहे आणि ही दहशत भाजप पुरस्कृत असून राष्ट्रीय पक्ष म्हणणाऱ्या पक्षाला हे लाजिरवाणे आहे, असेही थोरात म्हणाले.

पुढे बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले, मी ४० वर्षे विधानसभा सदस्य म्हणून काम केले आहे, पण अशी संस्कृती कधीही नव्हती. वादविवाद असतात परंतु त्यानंतर चहापानासाठी एकत्र यायचे. परंतु, सध्या गुंड विधानसभेत येत आहेत. मारहाण करतात. त्या गुंडांना संरक्षण दिले जात आहे. मारहाण करणाऱ्याला संरक्षण आणि मार खाणाऱ्याला मात्र शिक्षा हा काय प्रकार आहे. हे जनतेने वेळीच ओळखले पाहिजे. विधानसभेत झालेला राडा हा जाणीवपूर्वक दहशत निर्माण करण्याचा प्रकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्यावर बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले, प्रवीण गायकवाड हे छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर आणि संत परंपरांचे विचार समतेचे व बहुजनांचे विचार सांगत आहेत. हा विचार काही कडवट लोकांना सहन झाला नाही. त्यामुळेच त्यांच्यावर हल्ला झाला आहे. हा काटे कोण आहे? तो गुंड आहे आणि तो पदाधिकारी आहे. त्याला पद दिले जात आहे. या काटेच्या मागचे खरे सूत्रधार शोधले पाहिजे. असे काटे जनतेने मोडून काढले पाहिजे. जनतेने अधिक संवेदनशील होऊन जागृत झाले पाहिजे. सरकारच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे. आम्ही तर लढणारच आहोत, परंतु जनतेनेही याबाबत आवाज उठवणे गरजेचे आहे.

महायुती सरकारने अनेक खोटी आश्वासने देऊन सत्तेवर आली आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आमिष दाखवले. मात्र, पंधराशे वेळेवर दिले जात नाही. अनेक लाडक्या बहिणींची नावे दररोज कमी केली जात आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी नाही. शेतकरी अडचणीत आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हे सरकारची जबाबदारी आहे. मात्र, सरकार याबाबत बोलत नाही. शेतकऱ्यांनी सरकारला जाब विचारला पाहिजे, असे बाळासाहेब थोरात म्हणाले.

## मुंबईला जगाशी जोडण्याचा प्रयत्न : एकनाथ शिंदे



**मुंबई** : तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहेत आणि त्यामुळे दोषसिद्धीचे प्रमाण वाढत आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज विधानपरिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावाच्या चर्चेला उत्तर देताना म्हणाले. मराठी माणसासाठी महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयाची माहिती देताना त्यांनी यावेळी सरकारचा मुंबईला जगाशी जोडण्याचा प्रयत्न असल्याचेही स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गेल्या अडीच तीन वर्षांत महायुती सरकारने मराठी भाषेबाबत अनेक निर्णय घेतले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी माशेलकर समिती तत्कालीन सरकारने स्थापन केलेली होती. या समितीच्या अहवालात जागतिक स्तरावर मराठी मुले मागे पडू नयेत म्हणून इंग्रजी भाषा पहिल्यापासून सक्तीची शिफारस होती. त्यावेळच्या सरकारने इंग्रजीबरोबर हिंदीचाही त्रिभाषा सूत्रासाठी विचार केला. त्यामुळे मराठी, इंग्रजी सोबत हिंदी सक्तीची भाषा करावी असा स्पष्ट उल्लेख या अहवालात आहे. २७ जानेवारी २०२२ च्या मंत्रिमंडळ बैठकीत डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील टास्क फोर्सचा अहवाल स्वीकारण्यात आला होता. महायुती सरकारने हिंदीची सक्ती केली नाही आणि हिंदीची पुस्तके छापली नाहीत.

रिद्धपूर येथे मराठी विद्यापीठ स्थापन करून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न पूर्ण करीत आहोत. वारकऱ्यांसाठी संत विद्यापीठ आपण स्थापन करतोय. चर्नी रोड येथे भव्य असे मराठी भाषा भवन उभे राहत आहे. नवी मुंबईच्या ऐरोली येथे मराठी भाषा उपकेंद्र उभे रहात आहे. मराठी भाषा धोरणास आमच्या सरकारने मंजुरी दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर केला आहे. मराठी भाषा जगभर पोहोचावी यासाठी दरवर्षी विश्व मराठी संमेलन आयोजित केले जाते. प्रत्येक जिल्ह्यात कवितेचे गाव सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मराठी राज्य गीत आमच्या सरकारने सुरू केले. मुंबईबाहेर फेकला गेलेला मराठी माणूस परत मुंबईला आला पाहिजे म्हणून आम्ही मोठ्या प्रमाणावर मुंबई आणि परिसरात सन्मानाने घर देतो आहोत. मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार तोडणार अशी भाषा करणाऱ्यांना सांगतो की आम्ही मुंबईला जगाशी जोडतोय, असेही ते म्हणाले.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राहावी म्हणून गेल्या अडीच तीन वर्षात सरकारने परिणामकारक प्रयत्न केले असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये ६० दिवसात निर्गती करण्याचे प्रमाण २०१८ मध्ये हे प्रमाण १५.३ टक्के होतं आता ते ९४.१ टक्के इतकं झालंय. सर्व पोलिस आयुक्तालय आणि पोलीस अधीक्षक स्तरावर महिला पोलीस कक्षाची स्थापना, निर्भया फंडमध्ये प्रत्येक पोलीस स्टेशनला एक लाख रुपये याप्रमाणे निधी दिला आहे. महिलांसाठी २४ बाय ७ डेडिकेटेड हेल्पलाइन सुरू आहे. २७ विशेष न्यायालयांमधून महिलांवरील अत्याचाराची प्रकरणं निकाली काढण्यात येतात. पोस्कोसाठी १३८ फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याचे आदेश आहेत. सध्या २० पॉक्सो आणि १२ जलदगती विशेष न्यायालय सुरू आहेत. लहान मुलांवरील अत्याचाराच्या तक्रारीसाठी १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन सुद्धा सुरू केली आहे.ऑपरेशन ब्लॅक फेस मध्ये लहान मुलांचे अश्लील व्हिडिओ चित्रे अपलोड करणाऱ्या १९६ जणांना अटक केली आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
DMLT कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी /१२ वी पास
SANITARY HEALTH INSPECTOR कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी /१२ वी पास
PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY कालावधी २ वर्ष पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास
ADMISSION OPEN
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १९ जुलै २०२५

# संघर्षगाथा

## बहुजन विद्यार्थिनींच्या संघर्षगाथेचा दस्तावेज




विषमताग्रस्त समाज व्यवस्थेत स्त्रियांनी शिक्षण घेणं; स्वतःचा आवाज निर्माण करणं हे एवढं सोपं नाही. एखादी व्यक्ती घडत असताना त्याची झालेली जडणघडण ही अतिशय महत्त्वाची असते. तो कोणत्या परिस्थितीतून समोर आला. त्याची पार्श्वभूमी काय? याकडे लक्ष देणे व ती सामाजिकरणाची प्रक्रिया समजून घेणं गरजेचं आहे. इतिहासाने सिद्ध केले आहे की, जे संघर्ष करतात ते तावून-सुलाखून निघतात. परिस्थितीशी बेडरपणे दोन हात करतात ते कुणालाही घाबरत नाही. अशाच व्यक्ती स्वतःची प्रतिमा आणि प्रतिभा निर्माण करताना दिसून येतात. अशाच व्यक्तीचे व्यक्तिमत्व इतरांना मार्गदर्शक ठरते. लातूर जिल्ह्यातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उप-परिसर, लातूर येथील सामाजिकशास्त्रे संकुलातील विविध जात, धर्म, वर्गातील व ज्यांची पहिलीच पिढी उच्च शिक्षणात आली आहे अशा परिघावरील विद्यार्थिनींचा संघर्षमय जीवनप्रवास पुस्तक रूपाने हरिती प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला आहे.

संघर्षगाथा : बहुजन विद्यार्थिनींचा जीवनप्रवास हे अनिल जायभाये आणि पंचशील डावकर यांनी संपादित केलेले पुस्तक म्हणजे बहुजनांच्या मुलींनी प्राप्त परिस्थितीशी केलेली झुंज आहे. आणि यातून त्यांनी स्वतःला सिद्ध केले आहे की, आम्ही कोणत्याही बाबतीत कमी नाही.. ना ज्ञानाच्या बाबतीत, ना कष्टाच्या बाबतीत.... आपल्या वाट्याला आलेलं जे काही आहे त्याकडे संधी म्हणून बघणं हा त्यांचा स्थायीभाव आहे. प्रस्थापित व्यवस्थेतील स्त्रियांचा जीवन प्रवास हा निश्चितच भिन्न असतो. बहुजन स्त्रियांना प्रत्येक पावलागणिक संघर्ष असतो. त्यांच्या काट्याकुट्याच्या वाटा, प्रचंड खाचखळगे आणि चढउताराच्या असतात. समाज काय म्हणेल? घरचे काय म्हणतील? या साऱ्या दबावाखाली त्यांना स्वतःच अस्तित्व निर्माण करावे लागते. घरच्यांनी पाठिंबा दिला नाही तर पुढे जाताच येणार नाही अशी परिस्थिती असते. काही बाबतीत घरच्यांचा पाठींबा असला तरी सामाजिक सुविधांचा अभाव, बिकट आर्थिक परिस्थिती, स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल सार्वजनिक उदासीनता, शैक्षणिक सुविधांचा अभाव ही आव्हाने आहेतच. पण याही परिस्थितीत सारी आव्हाने झेलीत झेलीत पुढे जाणाऱ्याही काही कमी नाहीत. प्रवाहाविरुद्ध जाऊन इतरांसाठी दीपस्तंभ ठरू पाहणाऱ्याही खूप आहेत.

या ग्रंथात सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या विविध ३० विद्यार्थिनींचे स्व कथन आहे. खरे तर तो प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा आक्रोश आहे. त्यांनी केलेला संघर्ष स्वतःच्या भाषेत त्यांनी मांडला आहे. ही भाषा त्यांना सहज उमगली नाही. संघर्ष करत करत ही भाषा त्यांना अवगत झाली. आज ती त्यांच्या ओठावर आली आणि लेखनाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आली. आत्तापर्यंत त्यांचा झालेला प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या विद्यार्थिनींनी परिस्थितीशी दोन हात करत झुंजल्या, त्या डगमगल्या नाहीत. त्यातून त्यांचं व्यक्तिमत्व घडले. या विद्यार्थिनींनी केलेले कथन हे आपल्याच कुटूंबातील आहे असे वाचताना वाटते. प्रत्येकीच्या कहाणीचा पदर हा वेगवेगळ्या धाटणीचा असून वाचताना एक कुतूहल निर्माण होते. अलीकडे असे अनुभव वर्तमान तरुण पिढीच्या वाट्याला येईलच असे नाही, मात्र यानिमित्ताने आत्मभान येण्यासाठी या ग्रंथाचे आवर्जून वाचन करायला हवे. कठीण परिस्थितीतून मार्ग कसा काढावा यासाठी हे आत्मचिंतन दिशादर्शक ठरते. अगदी प्रामाणिक व कसलीही भीड न बाळगता केलेला हा प्रपंच जिवंत अनुभव देतो. यात आपल्या जगण्यातील अनुभवांशी या मुली भिडतांना दिसतात. सहज कळेल अशी साधी सोपी भाषा येथे वापरली आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचायला घेतले की, भिन्न स्वरूपाचा असा वेदनादायक सामाजिक सांस्कृतिक अनुभव आपणाला येतो.

बहुजन विद्यार्थिनींचा हा जीवनप्रवास निश्चितच सोपा नाही. पावलागणिक आलेल्या प्रत्येक संकटाला न घाबरता त्याला परतवून लावून नव्या उमेदीने व ताठ मानेने उभे राहण्याचे धाडस यातून दिसून येते. त्यांनी ज्या परिस्थितीत आलेल्या संकटाला धैर्याने जे तोंड दिले त्याचे कितीही कौतुक केले तरी हे कमीच आहे. या पुस्तकाला लेखन पाटीच्या पार्श्वभूमीवर असलेले 'काटेरी झाड' असे साजेशे मुखपृष्ठ उत्तम जमले आहे. या पुस्तकात विविध सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या तीस विद्यार्थिनींनी आपल्या जीवन संघर्षाचा लेखाजोगा मांडला आहे. यात प्रामुख्याने निशा शिंदे, संध्या वाडकर, प्राजक्ता लोंडाळ, स्नेहा चामले, भावना कदम, आशा पठाण, सुमेधा ढवळे, अंजली कुलकर्णी, जन्नत शेख, पुनम ढगे, स्वाती हाळसपुरे, वैशाली सोमवंशी, माया चव्हाण, अलका मस्के, छाया जगताप, प्रियंका लाडलापुरे, अलका समुखराव, विद्या हातोलकर, वैष्णवी राठोड, अंजना राठोड, अश्विनी साखरे, श्रद्धा शेळके, वैशाली थोरात, स्नेहा शिंदे, आम्रपाली कांबळे, राजश्री कांबळे, मोहिनी देशमुख, कावेरी माने, लक्ष्मी हवालदार, पंचशील डावकर या विद्यार्थिनींनी त्यांच्या वाटेला आलेले जीवन शब्दबद्ध केले आहे. प्रस्तुत लेखनातील अनेक प्रसंग हे काळीज चिरून टाकणारे आणि संवेदनशील व्यक्तीला अस्वस्थ करून सोडणारे आहेत. २१ व्या शतकात स्त्री शिक्षणाचा प्रसार, प्रचार आणि स्त्रियांचा शिक्षणातील सहभाग याबाबत आपले तयार झालेले समज ह्या पुस्तकातील विद्यार्थिनीचे अनुभव वाचताना बदलावे लागतील. स्त्री शिक्षणाची आजची परिस्थिती गंभीरपणे समजून घ्यावी लागेल असे हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते.

अनिल जायभाये यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांकडून केलेला हा प्रयोग सर्वांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे असे मला वाटते. निर्जीव वस्तू हवी तशी आपणाला घडविता येते, तिला आकार देता येतो, मात्र जिवंत व्यक्तींवर संस्कार करणे आणि ते रुजविणे, त्यांच्याकडून विधायक कार्य करवून घेणे ही सोपी बाब नाही. एक प्राध्यापक/प्राध्यापिका म्हणून विद्यार्थिनीनं सोबत सामूहिकपणे कार्य करणे, लेखन-वाचन करणे व त्यातून एक जीवनप्रवासाची सामूहिक अक्षरकलाकृती तयार करणे ही कौतुकास्पद बाब आहे. अनिल व पंचशील यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांकडून हे काम पूर्ण केले आहे. विशेषतः अलीकडे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील ऋणानुबंध फारसा राहिला नाही अशी परिस्थिती आहे. याला अपवाद अनिल आणि त्याचे विद्यार्थी आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात शिकण्या-शिकवण्याबद्दल समतावादी विचार असेल, एकमेकांप्रती प्रेम, आपुलकी असेल तर नवनिर्मिती होते. चार-पाच पानांमध्ये आपला जीवन संघर्ष मांडणे हे कठीण काम असून ते शब्दबद्ध करणे हे महाकठीण. येथे शब्द गुंफण्यापेक्षाही जीवन संघर्ष हा अतिशय कष्टप्रद असतो. मात्र ज्यांनी संघर्ष भोगला त्यांना ते कठीण नसते. यातील प्रत्येक विद्यार्थिनींचे दुःख, त्यांच्या वेदना, संवेदनशीलता परिस्थितीशी झगडणं हे भिन्नभिन्न पातळीवरच आहे.

बहुजन समाजातील या पिढीच्या वेदना ह्या बऱ्याचदा सारख्या स्वरूपाच्या दिसून येतात. त्यांना आलेले जाती भेदाचे, स्त्री पुरूष असमानतेचे अनुभव, इतरांशी संपर्क साधताना वाटणारी भीती, आपल्यात खूप काही कमी आहे म्हणून निर्माण होणारा न्यूनगंड, पाठीवर शाबासकीची थाप देणारे कोणी नाही, आजूबाजूचा डोळे दिपवून टाकणारा झगमगाट, हे सार माझ्याच पदरी का? असले अनेक प्रश्न निर्माण होताना दिसून येतात.. मात्र जीवन प्रवासात हे होणे अपेक्षित आहे. कुठे जन्म घ्यावा हे आपल्या हातात नाही. मात्र परिस्थिती बदलविण्याची ताकद ही आपल्यात आहे. यावरच प्रामुख्याने भर देणारे हे सारे जीवन प्रवास हजारो विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे आहे. प्रत्येक शिक्षक, प्राध्यापकांनी यासाठी वाचावे की, आपल्यासमोर कोणत्या परिस्थितीतील विद्यार्थी-विद्यार्थिनी वर्गात येत आहेत आणि आपण त्यासाठी कोणत्या प्रकारचं शिक्षण आणि व्यवहार उभा करण आवश्यक आहे. तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांनी आवर्जून वाचावे कारण आपल्याच घरातील मुलींना कोणकोणत्या घुसमटीतून, मानसिक संघर्षातून जावे लागते. ज्यात आपल्या दैनंदिन जीवनात आपण स्त्रियांचं स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणून समजून न घेता त्यांचा अवकाश संपून टाकत असतो. समाजातील युवकांनी यासाठी हे पुस्तक वाचावं की आपल्या सभोतालची परिस्थिती जरी बिकट, संघर्षमय असली तरी आपणास त्यावर मात करता येते. नवे नवे मार्ग काढता येतात.

आजच्या या शैक्षणिक अवमूल्यनच्या आणि गुंतागुंतीच्या परिस्थितीत शिकून काय दिवे लावणारं ? असा विचार जनमानसात रुजताना दिसून येतो. या अशा काळात इतरांनाही जगण्याचं बळ देणाऱ्या या विद्यार्थिनी आहेत. यातील अनेकजणी आज समाजात मानाची पदे भूषवताना दिसून येतात. परिस्थिती बदलविण्याची ताकद आपल्या मनगटात असते हे त्यांनी आता सिद्ध केले आहे. जीवनात आलेले अस्सल अनुभव कोणत्याही प्रकारे न लपविता वा कुणी काही म्हणेल काय ? याची भीड न ठेवता सहज त्यांनी मांडले आहे. त्यामुळे हा त्यांचा जीवन प्रवास पुन्हा पुन्हा अनुभवण्यासारखा आहे. त्यातून आपणाला पुन्हा पुन्हा जगण्याची ऊर्जा मिळेल असे वाटते. प्रत्येकीच्या वाट्याला आलेला हा जीवन प्रवास भिन्नभिन्न परिस्थितीला छेदत त्यातून मार्ग काढत आणि स्वाभिमानाने समाजात मिरवतो आहे. उन्हातान्हातून आणि परिस्थितीतून तावूनसुलाखून निघालेल्या या सावित्रींच्या लेकींमध्ये आता प्रचंड ताकद आली आहे. आता त्या कोणत्याही संकटाला घाबरत नाहीत. संकट ही एक संधी मानून इतरांना प्रेरणा देत त्या पुढे पुढे जाणार आहेत. अशाच पद्धतीची निर्भयता समाजातील अनेक विद्यार्थिनींना यावी. त्यांचे मन आणि मनगट विवेकी विचाराने मजबूत व्हावे आणि समाजात स्वाभिमानाने, निर्भयपणे त्यांनी जीवन जगावे अशी अपेक्षा आहे.

**प्रा. प्रियदर्शन भवरे**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना**

**संघर्षगाथा: बहुजन विद्यार्थिनींचा जीवनप्रवास**

**संपादन : अनिल जायभाये आणि पंचशील डावकर**
**पृष्ठे ३०४ / मूल्य ४०० ₹**
**हरिती प्रकाशन, पुणे.**
**पुस्तकासाठी संपर्क : राहुल - ७३८५५२१३३६**